जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 09-02-2020

लोकसत्ता

# मेघा पानसरे, किरण गुरव यांना राज्य वाङ्मय पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी लोकसत्ता**

**कोल्हापूर** : सन २०१८ या वर्षाकरिता उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार बुधवारी घोषित करण्यात आले असून त्यामध्ये कोल्हापुरातील डॉ. मेघा पानसरे व किरण गुरव दोघा लेखकांचा समावेश आहे. दोन्ही पुरस्कार १ लाख रुपयांचे आहेत.

सामाजिक कार्यकर्त्या आणि रशियन भाषा अभ्यासक मेघा पानसरे यांच्या 'सोवियत रशियन कथा' या प्रौढ वाङ्मय-अनुवादित प्रकारातील पुस्तकास 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार' जाहीर झाला आहे.



मेघा पानसरे



किरण गुरव

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या विभागप्रमुख व रशियन भाषेच्या सहायक प्रा. पानसरे यांना रशियन सांस्कृतिक केंद्र, तिरुवनंतपुरम व शासकीय इसेनिन म्युझियम, मॉस्को या संस्थांच्या वतीने 'सिर्गेइ इसेनिन पुरस्कार - २०१९' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार अलीकडेच प्रदान करण्यात होता. पाठोपाठ त्यांच्या रशियन साहित्यकृती मराठीत आणण्याच्या वाङ्मयीन कृतीवर राज्य शासनाची मोहोर उमटली आहे. 'हा पुरस्कार म्हणजे तीस वर्षांच्या या क्षेत्रातील कामाचा सन्मान आहे', असा उल्लेख करून डॉ. मेघा पानसरे यांनी 'भारत व रशिया या दोन देशांचे सांस्कृतिक, साहित्यिक संबंध विकसित करण्याच्या प्रयत्नाला शासनाची दाद मिळाली आहे', असे 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले.

शिवाजी विद्यापीठातील अधीक्षक, संवेदनशील लेखक किरण गुरव यांच्या 'जुगाड' या कादंबरीला 'ह. ना. आपटे पुरस्कार' जाहीर झाला आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करून गुरव म्हणाले, 'अभियांत्रिकीचे उच्च शिक्षण घेऊनही बेकारीचा कटू अनुभव घेणारी पिढी कधीतरी याच क्षेत्रात अल्प वेतनावर काम करू लागते तेव्हा त्याचे जीवन कसे यंत्रवत होते याचा सूक्ष्म वेध 'जुगाड 'कादंबरीत आहे. यापूर्वी या कादंबरीला महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका, ग. ल. ठोकळ पुरस्कार मिळाले आहेत. तर आधी तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून त्यातील 'राखीव सावल्यांचा खेळ' या पुस्तकास पद्मश्री विखे पाटील, बी. रघुनाथ पुरस्कार मिळाले असल्याचे त्यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले.

# महिलांवरील अत्याचार थांबवा

## विद्यापीठात पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांची रॅली

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'नारी का सन्मान करो', 'वुमेन्स पॉवर, नेशन्स पॉवर', 'भारतीय राज्यघटेचा सन्मान करा' अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडली.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने शनिवारी विद्यापीठ परिसरात रॅली काढून जनजागृती करण्यात आली. रॅलीचा प्रारंभ विद्यार्थिनी वसतिगृहापासून झाला. विद्यार्थिनींनी लाल रंगाची ओढणी व पांढऱ्या रंगाचा टॉप परिधान केला होता. विद्यार्थ्यांनी काळ्या रंगाचे कपडे परिधान करून महिलांवरील हिंसाचाराचा निषेध नोंदवला. 'महिलांवरील अत्याचार रोखा', 'घरगुतीहिंसाचार टाळा', 'महिलांना समतेची वागणूक द्या', असे फलक हातात घेऊन विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते.

रॅली ग्रंथालयमार्गे मुख्य इमारतीपर्यंत पोहोचली. मुख्य इमारतीसमोर विद्यार्थ्यांनी महिलांचा सन्मान करण्याची प्रतिज्ञा केली. रॅलीत विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी मार्गदर्शन केले. रॅलीमध्ये डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह कल्याणी अमनगी, गौरव पाटील, श्रेया कुलकर्णी, संदीप पाटील, अतुल घोवाळे आदी विद्यार्थी सहभागी झाले होते. रॅलीनंतर मानव्यशास्त्र सभागृहात विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने महिलांवरील अत्याचार थांबवा या संकल्पनेवर आधारित काढण्यात आलेली रॅली. (छाया : पप्पू अत्तार)**